मुरारवाडीच्या शाळेतील गांधीवादी विचारांचे विनायक गुरूजी गांधीजींच्या भाषणामुळे अधिक आक्रमक होतात. रंभाजी पाटलाची मदत घेवून ते मुरारवाडीत सर्व कोळी वाड्यातील माणसांना एकत्र करून चावडीवर सभा घेतात. या सभेचा अध्यक्ष म्हणून विनायकरावांची निवड होते. गावातील शेतकरी, कोळीवाड्यातील महिला यांच्या समोर विनायक गुरूजींची स्वातंत्र्य मिळवण्यासाठीच्या आंदोलनाचे जोरदार भाषण होते, परिणामतः गांधीविचारांच्या पवित्रा घेतलेल्या रंभाजी पाटील यांचे स्वातंत्र्य चळवळीसाठी बलिदान जाते. तसेच गांधीविचारांचे पाईक असलेले विनायक गुरूजी यांना अटक होते.

**समारोप :**

वि.वा.शिरवाडकर यांची वैष्णव ही कादंबरी स्वातंत्र्याच्या दशकाला (१९४० ते १९५०) उजागर करते. या काळात मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्य चळवळीचा परिणाम पहावयास मिळतो. १९४२ ची चलेजाव चळवळीने त्या काळातील समाज लोकमाणसावर प्रचंड परिणाम घडविलेला आहे. समाजातील शिक्षक हा वर्ग शिकलेला असल्यामुळे त्या शिक्षणाचा उपयोग त्यांनी समाजामध्ये परिवर्तन घडविण्यासाठी केलेला आहे. 'वैष्णव' या कादंबरीत विनायकराव गुरूजी तत्कालीन तरूण पिढीचे प्रतिनिधीत्व करतात. 'पद्मावती'च्या रूपाने कादंबरीकाराने स्त्रीयांच्या जीवनातील समाजवास्तव लोकांसमोर मांडलेले आहे. स्त्रीयांकडे लंपटपणे बघण्याचा दृष्टीकोण समाजाने बदलायला हवा व 'स्त्री एक व्यक्ती' म्हणून तिचा व तिच्या संघर्षाचा आदर करायला हवा. हा संदेश या पात्राद्वारे कादंबरीकार देतात. इंग्रजी राजवटीपासून स्वातंत्र्य मिळवित असताना अनेकांचे बलिदान गेलेले आहे. त्याची आठवण आजच्या तरूण पिढीने ठेवली पाहिजे, स्वतःचे चरित्र तसेच राष्ट्रहित घडविले पाहिजे. हेच वैष्णव या कादंबरीचा अभ्यास करत असतांना प्रत्ययाला आलेले आहे. हेच समाजवास्तव कादंबरीकार वि.वा.शिरवाडकर यांना वैष्णव या कादंबरीतून सांगावयाचे आहे.

**संदर्भ :**

१. 'वैष्णव'- वि.वा.शिरवाडकर, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.

२. कुसूमाग्रजांचा सामाजिक साहित्य विचार, - डॉ.देवानंद सोनटक्के, हर्मिस प्रकाशन, पुणे.

३. रूपरेषा - वि.वा.शिरवाडकर संपा. सुभाष सोनवणे, चेतश्री प्रकाशन अमळनेर

४. 'अर्वाचिन मराठी साहित्याचा चिकित्सक आढावा' प्रा.रा.श्री जोग, वि.स.खांडेकर, प्रदक्षिण-खंड पहिला.

५. कुसूमाग्रज-विकिपीडीया.

**21**

# २१ व्या शतकातील महीला सक्षमीकरणाचे बदलते स्वरूप

डॉ. अपर्णा माधवराव कळंबे
कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर

**********

सन २००१ महीला सक्षमीकरणाचे वर्ष मानले जात असले तरी स्वातंत्र्यपूर्व काळात महीलाचे सक्षमीकरण करण्यासाठी छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, राजा राममोहनराय, लोकमान्य टिळक, अशा मान्यवरांनी महिलांच्या सक्षमीकरणास प्रोत्साहन दिले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी मुलीच्या शिक्षणासाठी शाळा सुरू करून महीलांचे सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

१८५१ साली पुण्यात मुलींची शाळा एतद्देशीय (याच देशातील लोक) गृहस्थांनी मुलींची शाळा मंगळवार पेठेत होती. व तेथे दहा पाच मुलींच शिकत असत. पण यासाठी एक तरूण लोकांची मंडळी एकत्र होऊन त्यांनी आपसात वर्गणी जमा करून भर बुधवार पेठेत एका मुलींची शाळा स्थापन केली.

राष्ट्रातील प्रत्येक स्त्री किंवा पुरूष बालक, वृद्ध, अपंग, सुदृढ यांचा सर्वांगीण विकास झालेला असतो तर त्या देशाचा बहुमुखी विकास होतो. परंतू जागतिक पातळीवर व विविध स्तरावर महीलांचा कुठल्याही प्रकारचा विकास झालेला नाही. यासाठी शासनाने व सामाजिक संस्थांनी त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी अनेक योजना राबविल्या आहेत. भारतात स्वातंत्र्यापुर्व काळात महीलांचे सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न केला जातो. स्वातंत्र्यानंतर सक्षमीकरणाबाबत शासनाने अनेक धोरणे राबविली आहेत. परंतु सक्षमीकरण ही प्रक्रिया सतत चालणारी असली तरी प्रत्येक टप्प्यावर सक्षमीकरणाचे समर्पक अशी व्याख्या करता येता नसली तरी सक्षमीकरण ही संकल्पना खालीलप्रमाणे

स्पष्ट करता येईल.

१. डॉ. एम. यू. मुलाणी :—

स्त्रीने स्वत: च्या क्षमतांची ओळख करून घेऊन क्षमतांचा विकास करावयाच्या कौटुंबिक व सामाजिक निर्णयाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करणे म्हणजे सक्षमीकरण होय.

२. जागतिक बँकेने कलेली व्याख्या :—

व्यक्तींनी किंवा गटांना आपली पसंती ठरविण्याची व ही पसंती इष्ट त्या कृतीमध्ये आणि फलप्राप्तीमध्ये उतरवण्याची क्षमता वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे सक्षमीकरण होय.

३. स्त्रीला समाजात सुख समाधानाने आनंदाने जगता यावे तसेच कार्यक्षमता वाढविणे, समर्थपणे, कुटुंबात व समाजात भूमिका पार पाडणे, निर्णयप्रक्रियेत सहभागी होणे, समानता प्राप्त होणे म्हणजे महीला सक्षमीकरण होय.

४. महीलांना समाजकरणात, अर्थकरणात पुरूषांच्या बरोबरीने आणून त्यांना मानसिकदृष्टया व आर्थिकदृष्टया सुदृढ करणे म्हणजे महीला सक्षमीकरण होय.

५. महीला सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना शक्ती, कौशल्य, आणि क्षमता वृध्दिगत करण्यासाठी तसेच स्वत:चे सामाजिक जीवनमान उंचावून स्वावलंबी होण्यासाठी आवश्यक ते राजकीय, आर्थिक, पर्यावरण व शैक्षणिक धोरण निर्माण करण्याची प्रक्रिया होय.

**सक्षमीकरणबाबत असलेल्या वरील विचारांना लक्षात घेता सक्षमीकरणबाबत असे म्हणता येईल—**

१. स्त्रियांना स्व सामर्थ्याची जाणीव करून देणारे वातावरण निर्माण करणे.

२. सर्वच विभागामध्ये म्हणजे आर्थिक, साकाजिक, नागरिक आणि सांसकशतिक भागात स्त्रियांना विशेष स्थान.

३. देशव्यापी स्तरावर सामाजिक राजकारण आणि आर्थिक गोष्टीमध्ये निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग.

४. स्त्रियांना शिक्षण, आरोग्य, व्यक्तिमत्व विकास, धंदेवाईक शिक्षण यामध्ये समान संधी आणि समान रोजगार.

५. स्त्रिया व मुलींवर सर्वच स्तरावर होणाऱ्या अत्याचारांना आळा घालणे.

६. विकास प्रक्रियेत स्त्रियांना मुळ स्त्रोतात विशेष जागा.

७. बदलत्या व्यवस्थेच्या कार्यात स्त्री—पुरूष दोघांना बरोबरीचा सहभाग.

८. कायदेशीर न्यायामध्ये स्त्रियांना बरोबरीची वागणूक आणि भेदभाव दूर करणे.

९. नागरी संस्थामध्ये स्त्रियांच्या विकासाशी निगडीत कार्य करणाऱ्या संस्थांचा बरोबरीचा सहभाग.

**बदलते स्वरूप :—**

काळाच्या बदलत्या स्वरूपानुसार स्त्रियांची आजची स्थिती निश्चित बदललेली आणि सुधरलेली आहे स्त्रियांकरीता आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक उन्नतीचे अनेक मार्ग मोकळे झालेले आहेत. पाश्चात्य देशात स्त्रिया या पुरूषांच्या बंधनातुन मुक्त होतांना दिसत आहेत. भारतात मात्र बहुसंख्य स्त्रिया आजही अज्ञानाच्या अंधकारात बंदीस्त आहेत. स्वामी विवेकानंदांनी भारतीयस्त्रिच्या हया अवस्थेची निर्भत्सना केलेली आहे.

भारतीय तत्वज्ञानात स्त्रीचे महत्त्व असाधारण स्वरूपात मानलेले आहे. प्रकृती आणि पुरुष अशी विश्वाची दोन मुलतत्वे मानलेली असुन त्यापैकी कोणाही एकाचे महत्त्व दुसऱ्यापेक्षा कमी मानलेले भारतीय तत्वज्ञानात कुठेही आढळत नाही. स्त्रींना पुरूषांइतकेच महत्त्व देणारे भारतीय तत्वज्ञान वर - वर पाहता अनेक विसंगतींनी भरलेले आढळुन येते एका ठिकाणी जेथे स्त्रीला विश्वनिर्मीतीचा आधार मानलेले आहे तेथेच दुसऱ्या ठिकाणी तिला अनेक पापांची पोतडी किंवा मोहाचे मूळ कारण सुद्धा मानलेले आहे परंतू अशा प्रकारच्या विसंगती केवळ हिंदूतत्वज्ञानातच आहेत असे नाही. तर अॅडम आणि इव्ह या दोन प्रतिकांमध्ये बायबलमध्ये आणि कुरणातही ते आढळतात.

आज स्त्रीमुक्ती आणि स्त्री विकास या विषयावर मोठया प्रमाणात विचारमंथन होत आहे स्त्रियांना आत्मोन्नतीकरीता पुरूषांच्या मदतीची आवश्यकता नाही. त्या स्वत:चा विकास स्वसामार्थ्याने करू शकतात.

परावलंबित्वाचे स्त्रीचे शतकानुशतकाचे असणारे नाते स्त्री स्वकर्तृत्वाने आणि विविध प्रयत्नांनी दुर सारलेले आहे अबला हा शब्द आता स्त्रीवाचक म्हणून व्याकरणदृश्टया केवळ सत्य राहीलेला आहे स्त्रीच्या भूमिकेत व प्रतिमेत झालेला हा बदल चालू शतकातीलच आहे परंतु या परिवर्तनाची पार्श्वभूमी लक्षात घेण्यासाठी गेल्या शतकात भारताची स्त्रीयाच्या उन्नतीसाठी तिच्या ऐहिक व आत्मिक स्वातंत्र्यासाठी जे प्रयत्न केल्या गेलेत त्याची दखल घेणे आवश्यक आहे.

**सक्षमीकरणाचे निष्कर्ष :—**

सक्षमीकरणाच्या बाबतीत काही निकष आहेत. त्या आधारावर स्त्री सक्षमीकरणाचा आपणास विचार करता येईल.

१. महीलांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधार होणे, आरोग्याची स्थिती सुधारणे.

२. महीलांचा आर्थिक दर्जा सुधारणे, घरांमध्ये निर्णय प्रक्रियेत सहभाग मिळणे तसेच अन्न, योग्य प्रकारचा आहार उपलब्ध होणे.

३. महिलांच्या आत्मविश्वासात भर पडणे तसेच सामाजिक व कौटुंबीक बाबतीत मोल वाढणे.

४. महीलांमधील साक्षरतेचे प्रमाण वाढणे.

५. महिलांना नवीन प्रकारची माहीती व ज्ञान उपलब्ध होणे.

६. घरगुती हिंसाचार कमी होणे.

७. महिलांचे शारीरिक कष्ट

उदा. पाणी भरणे, लाकडे आणणे हे कष्ट कमी करणे.

**आर्थिक सक्षमीकरणाचे निष्कर्ष:—**

१. महिलांच्या आर्थिक उत्पन्नात भर पडणे व घरगुती उत्पन्नाच्या वाटा वाढणे.

२. महिलांना त्यांच्या आर्थिक अधिकाराची जाणीव होणे.

३. महिलांचे आरोग्य व आहाराची स्थिती सुधारणे.

४. कर्ज घेण्याच्या प्रक्रियेवर नियंत्रण असते.

५. बाजार व्यवस्था व घडामोडी तसेच वाटाघाटी करण्याची समज वाढणे.

६. घरातील आर्थिक व्यवहारामध्ये प्रमुख भूमिका बजावणे.

**समाजिक सक्षमीकरणाचे निष्कर्ष :—**

१. महीलांच्या स्वप्रतिमेत बदल होणे, आत्मविश्वास वाढणे.

२. स्वतःच्या परिस्थितीत बदल,

उदा :—सामाजिक, आर्थिक, राजकीय, आरोग्य आहार, कायदा, साक्षरता, आदीबाबत जागृती वाढणे.

३.महिलांचे गट तयार होणे त्यांच्या संघटना तयार होणे.

४. महिलांना माहिती व ज्ञान मिळण्याची संधी उपलब्ध असणे.

**महिलांची परिवर्तित स्थिती :—**

भारताच्या प्रदीर्घ इतिहासात सर्वच काळात सामाजिक दर्जा हा आर्थिक व राजकीय दर्जासारखाच असल्याचे दिसून येत नाही. भारतीय समाजात स्त्रियांचे जीवन काळानुसार चढउताराचे आढळुन आले. प्रत्येक काळात स्त्रियांचे प्रश्न व समस्या भिन्न भिन्न स्वरूपाच्या होत्या म्हणूनच भारतीय स्त्री म्हणावी तितकी सक्षम नव्हती. भारतीय स्त्रीची सध्यास्थिती जाणून घेण्यासाठी परंपरागत भारतीय समाजातील स्त्रीचे काय प्रश्न होती? समाजात तिचे स्थान काय होते ? हे जाणून घेणे महत्वाचे आहे.

**परंपरागत स्त्री :—**

भारतातील स्त्री आणि तिच्या दर्ज्यात वेळोवेळी झालेले बदल जाणून घेण्यासाठी भारताच्या स्त्रीविषयक इतिहासाचे चार काळ पाडता येतील ?

**१. प्राचीन काळ (इ.स. पूर्व १००० पर्यंत)**

साधारणतः आर्याच्या आगमनापासून ते सम्राट हर्षवर्धनाच्या राजवटीचा काळ हा प्राचीन काळ मानाला जातो वैदीक काळात महीलांना आदर दिला जात होता. त्यांचा सामाजिक दर्जा चांगला व समाधानी होता. स्त्रीला समाजात व कुटुंबात मत्त्वाचे स्थान होते. तिला शिक्षण, विवाह, धर्म या क्षेत्रात देखील पुरूशाप्रमाणे समान अधिकार प्राप्त होते वैदीक काळ आणि त्यानंतरचाही काही काळ हा स्त्री जीवनाच्या प्रगतीच्या दृष्टीने सुवर्णक्षरांनी लिहीण्यायोग्य होता. असे तत्कालीन ग्रंथावरून आढळून येते त्यवेळच्या स्त्रीयांचा पुरूषांच्या बरोबरीने समाजामध्ये, स्वगृही मान दिला जात असे. परंतु उत्तर वैदिक काळात स्त्रीच्या कौटुंबिक व सामाजिक

दर्ज्यात काही प्रमाणात ऱ्हास झाला. मनु परंपरा या काळात उदयास आली व महीला सक्षमीकरणाचा दर्जा घसरण्यास सुरूवात झाली.

एकूण स्त्रियांची स्थिती वेदकाळात व उपनिषदकाळात चांगली असून समाजातील स्थान वर्चस्वामुळे स्त्रिया परावलंबी झाल्या इ.स. ५०० नंतरच्या काळात स्त्रीच्या समाजातिल स्थानातील घसरगुंडी झाली. यापुढे पुराण काळात स्त्रिया दर्जा आणखी घसरला. त्या पुरूषांच्या वर्चस्वाखाली आल्या. स्त्रीचा स्वतंत्र आर्थिक दर्जा नाकारण्यात आला व विधवा स्त्रीला पुन:र्विवाह न करण्याचा आदेश देण्यात आला. ती प्रजोत्पादनाचे केवळ साधन बनली उत्तर स्मृतीकाळात मनुस्मृतीला जबरदस्त पगडा समाज मानावर पडला होता. पुरूषप्रधान संस्कृतीचा उहापोह करणाऱ्या स्मृतीकाराने अनेक बंधने लादली होती.

**२. मध्ययुगीन काळ (इ.स.१२०० ते इ.स. १८१८)**

सन ११९२ मध्ये महोम्मद घोरीने पृथ्वीराज चव्हाणचा तराईनच्या दुसऱ्या युद्धात पराभव केला. तेव्हा भारतीय संस्कृतीवर मुस्लिम संस्कृतीचा विजय झाला. त्याबरोबरच स्त्रियांच्या स्थितीत बदल झाला. मध्ययुगीन काळात सतिप्रथा किंवा विधवाचे जीवन अत्यंत विरक्त वृत्तीने जगावे हे कुलनीतीचे लक्षण त्या काळात अस्तित्वात होते. या काळात स्त्री जीवन हे अनुत्पादक व पुरूषां पुरूषांवर अवलंबुन होते. परकियांचे अत्याचार, धर्मांतर या गोष्टीचा स्त्रियांच्या परिस्थितीवर दुरगामी परिणाम झाला. त्याचे समाजातील स्थान घसरून हीन दशेस पोहोचले.

मध्ययुगीन काळ हा साधारणत: तीन उपकाळात पडतो. त्याचा विचार पुढीलप्रमाणे करता येतील.

अ. **सुलतानशाहीचा काळ :—**

सुलतानशाहीच्या काळात सर्वसाधारणपणे मुस्लिम व हिंदु समाजाला स्त्रियांना दुय्यम दर्जाचे स्थान होते अमीर खुस्त्रोच्या मतानुसार स्त्री कितीही गुणी असली तरी पुरूषांपेक्षा कनिष्ठ दर्जाची समजली जात असे तिच्या पवित्र्याकडे विशेष लक्ष दिल्या जात असे. एखाद्या मुलीच्या चारित्र्यावर जरी खोटे आरोप लावून तिला कलंकीत करण्याचा प्रयत्न केला तरी तिला मरण्यासारखे होते कारण तिच्याशी कोणीही विवाह करण्यास तयार होत नसे.

ब. **मोगलशाहीचा काळ (इ. स. १५०० ते १७००)**

मध्ययुगातील द्वितीय काळ विभाग हा मोगलशाहीचा काळ मानला जातो या काळामध्ये स्त्रियांना समाजात निम्न दर्जा होता. ज्यावेळी मध्ययुगीन अरबी प्रदेशात स्त्रिया समाज व राजकरणात मोठया प्रमाणात स्वातंत्र्याच्या उपभोग घेत होत्या त्यावेळी भारतातील मुस्लिम स्त्रियांना समाजातिल कनिश्ठ दर्जा स्वीकारावा लागला.

क. **मराठेशाहीचा काळ (इ.स. १७०० ते इ. स. १८१८)**

मराठेशाहीचा काळात स्त्रियांची स्थिती त्या वेळच्या दक्षिण भारतातील इतर भागातील स्त्रियांप्रमाणे होती. तिच्यावर सर्व प्रकारची सामाजिक बंधने असून सामाजिक स्वातंत्र्य नव्हते. बालविवाह पद्धती, हुंडा व सती पद्धतीला तोंडे द्यावे लागत असे. बहुविवाह पद्धतीने स्त्रियांचा दर्जा कमी झाला.

**३. ब्रिटीश राजवटीच्या काळातील स्त्री (इ.स. १८१८ ते इ. स.१९४७)**

१६ व्या शतकात व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या ब्रिटीशांनी प्लासीच्या लढाईत विजय मिळविला. १८१८ मध्ये मराठांच्या पराभव करून ब्रिटीशांनी येथे आपली सत्ता प्रस्थापीत केली. १५० वर्शे म्हणजे १९४७ पर्यंत भारतावर राज्य केले असले तरी ब्रिटीशांनी मात्र भारतात अनेक सुधारणांचे मुहुर्तमेढ रोवली. स्त्रियांसाठी विशेश कायदे करून व सर्वासांठी शिक्षण खुले करून खऱ्या अर्थाने स्त्री सक्षमीकरणाला त्यांनी चालना दिली. भारतीय समाजात त्या काळात ज्या अनिष्ट रूढी परंपरा होत्या. उदा.- बालविवाह, सती, बहुपानी यातून स्त्रीला सोडविण्यासाठी ब्रिटीश शासन काळात प्रयत्न झाल्याचे आढळते. त्यांनी कायदे करण्याबरोबरच १८५३ पासुन मुक्त शिक्षण पद्धतीने धोरण अवलंबवीले त्यानुसार स्त्री शुद्रासह सर्वांना शिक्षण खुले झाले. महात्मा फुले यांनी पुणे येथे मुलींची शाळा काढली. शिक्षण हा स्त्रियांचा उद्धाराचा योग्य मार्ग आहे हे ओळखुन त्या काळात अनेक सेवाभावी संस्थानी मलींसाठी शाळा काढल्या.

स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने आणण्याचा प्रयत्न या काळात झाला.

ब्रिटीश काळात स्त्रियांना प्रथा व अनिष्ट रूढीच्या जोखडातुन मुक्त करण्यासाठी काही महीला संघटनांचा देखील उदय झाला होता. या संघटनांचे नेतृत्व देखील महीलांनीच केले होते. उदा. भारतीय स्त्री महामंडळ (१९१०), विमेन्स इंडीयन असोसिएशन (१९१७), नॅशनल कौन्सील ऑफ विमेन इन इंडीया (१९२१), ऑल इंडीया कॉन्फरन्स (१९२७).

ब्रिटीश काळात झालेले स्त्री सुधारणाविषयक कायदे, स्त्री शिक्षणाचा प्रसार, स्त्रियांचा सार्वजनिक सहभाग, स्त्री मुक्ती महीला संघटनांचा प्रभाव पाहुन स्त्रियांची सामाजिक स्थिती सुधारण्यास हा काळ उपयुक्त ठरला आहे.

**४. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्त्री (इ.स. १९४७ नंतर),**

स्वातंत्र्यानंतरच्या ४० वर्षात भारतीय स्त्री जीवनात अनेक क्रांतीकारक बदल घडून आले आहेत. स्वतंत्र भारताचा संविधानात समता, स्वातंत्र्य व न्याय या लोकशाही तत्वाचा स्वीकार करून भारतीय स्त्रीला पुरूशांच्या बरोबरीने हक्क बहाल केले आहेत. आज पुरागामी कायद्याबरोबरच कल्याणकारी योजना स्त्री मुक्ती चळवळ, औद्योगिकिकरण व नागरीकरण, जागतिकीकरण यासारख्याच प्रक्रियांमुळे स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री स्वावलंबी बनत आहे.

विवाह संस्थेतही आमुलाग्र बदल होऊन विवाह अधिनीयम १९५४ नुसार स्त्रीदेखील पुरूषांप्रमाणेच आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करू शकते. घटकस्फोटीत किंवा अविवाहीत अशा मुलाप्रमाणेच मुली दत्तक घेण्याचा अधिकार दिला आहे.

वैघकीय गर्भापात अधिनीयम १९७१ नुसार मुल नको असल्यास गर्भवती स्त्रीला गर्भपात करण्याचा अधिकार दिला आहे. शिक्षण राजकरण, सांस्कृतीक क्षेत्रात देखील आजच्या काळात स्त्रियांना समान संधी मिळत आहे.

उपरोक्त चार काळातील स्त्रियांच्या आर्थिक, सामाजिक सांस्कृतीक राजकीय व शैक्षणीक परिस्थीतीचा विचार केला असता वैदिक काळा वगळता सर्वच काळात स्त्रीचा दर्जा हा नेहमी दुय्यम व गौण राहीलेला दिसुन येतो.

**सबलीकरण्याची आवश्यकता (सक्षमीकरण):—**

प्रत्येक राष्ट्र आपल्या देशातील स्त्री पुरूषांच्या विकासामार्फत देशात सर्वांगीण विकास करू शकते. म्हणुन राष्ट्राच्या विकासामध्ये पुरूषांबरोबरच स्त्रीविकास विचारात घ्यावा लागेल. म्हणून स्त्री विकासासाठी स्त्री सबलीकरण आवश्यक आहे भारताचा विकास हा ग्रामीण भागावर अवलंबुन आहे जोपर्यंत ग्रामीण विकास होत नाही. तोपर्यंत भारताचा विकास होणार नाही. कारण २००१ च्या जणगणनेनुसार भारतातील ७२ टक्के लोकसंख्या ही आजही ग्रामीण भागात राहते त्यातील ४८ टक्के लोकसंख्या स्त्रियांची आहे. तसच शेतातील बरीच कामे स्त्रियांमार्फत केली जातात. त्याचबरोबर ग्रामीण भागातील महिला आजही शेती व शेतीशी निगडीत व्यवसायात काम करतात म्हणून ग्रामीण विकासासाठी स्त्री सबलीकरण आवश्यक आहे.

१. देशातील सर्वांगीण साधन संपत्तीच्या विकासासाठी सबलीकरण गरजेचे आहे.

२. महिला सबलीकरणामुळे स्त्री पुरूषांची सर्वच स्तरावर समानता प्रस्थापीत होईल, त्यामुळे विकासाची संकल्पना अस्तित्वात येईल.

३. स्त्री घटकाला मानसिक, सामाजिक, आर्थिक विकासाकरीता सबलीकरण आवश्यक आहे.

४. महीलांचे आरोग्य, मानसन्मान वाढविणे, जीवनमान उंचावणे, समाजात निर्भरतेने जगणे.

५. महीला सबलीकरणाच्या दृष्टीने सहाय्याकरीता स्वावलंबन, महीला कौशल्य, स्वास्थ्य रोजगार, निर्णय प्रक्रियेत सहभाग तसेच समाजाच्या वैचारीक दृष्टीकोनातुन सकारात्मक बदल घडवून आणण्याकरिता महीला सबलीकरण आवश्यक आहे.

६. राजकीय क्षेत्रातील दुर्गुनांचा नाश करण्याकरीता व राजकीय क्षेत्रात प्रवेश करण्याकरीता सबलीकरण गरजेचे आहे.

७. महीलांना आर्थिक समता, हक्क अधिकार, निर्णय, कर्तव्य, स्वअस्तित्व याची जाणीव व्हावी.

८. जागतिकीकरणच्या प्रक्रियेत हरविलेली महीला हे कलंक पुसून काढण्याकरीता व स्वतःच्या अंगी असलेल्या

गुणांचा विकास करण्याकरीत.

९. पुरूषांना स्त्रिच्या त्यागाची, कर्तव्याची आणि सहनशिलतेची जाणीव करून देण्यासठी महीला सबलीकरणाची आवश्यकता आहे.

१०. महीला सर्वच क्षेत्रामध्ये पुरूषांच्या बरोबरीने कामे करू शकतील.

संदर्भसूची :-

१. महीला स्वयंसहाय्यता बचत गट
२. स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा
३. अल्पबचत नियोजन
४. राज्यस्तरीय चर्चासत्र, ऑक्टोबर २००५
५. मासिक योजना, ऑगस्ट २००४
६. स्त्री
७. विविधांगी आयामातून स्त्री
८. यशमंथन, जानेवारी — मार्च २०११
९. पाटील
१०. मासिक योजना, मे २००१

❑❑❑

22

# बारेली बोली की लोकोक्तियां एवं कहावतें

अनूप कुमार जमरे
शोधार्थी, हिन्दी अध्ययनशाला,
विक्रम विश्वविद्यालय, उज्जैन, म.प्र.

**********

लोक में प्रचलित उक्ति को लोकोक्ति कहा जाता है। कहावत हिन्दी भाषा का शब्द है। जिसका मतलब होता है **कही हुई बात या कथन**, परन्तु सभी कहीं हुई बातों को कहावतें नहीं कह सकते। कहावत का अर्थ होता है जिसमें **जीवन के अनुभव का सार** हो। जो समय .काल के अनुसार सार्थक रूप प्रस्तुत करे उसे हम कहावते कह सकते हैं। जिस बात को अनुभवपूर्ण चमत्कारिक संक्षिप्त रूप में कहा जाए, उसे हम कहावत कहेंगे। जैसे— बारेली में बुले तेरा **बुरे वेचाये नी—ते मुंगड़ा बी —नी वेचाये**। अर्थात—जो बोलता है,वह बैर भी बैच देता है और जो नहीं बोलता उसके मुंग भी नहीं बिकते।

लोकोक्तियों ने मनुष्य जीवन के प्रत्येक पहलू को छुआ है। लोकोक्तियों और कहावतों में किसी क्षेत्रीय समाज के आचार—विचार, रहन—सहन, नैतिकता, रीति—रिवाज, धार्मिकता का विवरण तो मिलता ही है साथ ही समाज की नैसर्गिक प्राकृतिक घटनाओं की विशेषताएं,ऐतिहासिक घटनाएं,प्रथाएं,भुगोल,स्वास्थ्य,भाग्य कर्म,परम्पराएं,जाति विशेष,कृषि कर्म,नक्षत्र, ज्योतिष विज्ञान,समुद्र,पर्वत, नदी,सजावट सामग्री,रोग उपचार, आभूषण, मानवीय चेतना,स्वभाव की विशेषताएं, शरीर विज्ञान,नृत्य,संगीत,नाट्य, वनस्पति विज्ञान आदि सभी का ज्ञान प्राप्त होता है।

लोकोक्तियां लोक जीवन की अनुभूति से सम्बन्धित होने के कारण प्रसिद्ध विद्वान डॉ. धीरेन्द्र वर्मा इन्हें **ग्रामीण जनता का नीति शास्त्र** कहते हैं। ग्रामीण जन में इनका चलन आज भी यथावत प्रसिद्ध